निसर्ग पर्यटनाअंतर्गत राज्यातील व्याघ्र प्रकल्प,
राष्ट्रीय उद्याने व अभयारण्ये यांच्या
विकासाच्या प्रस्तावात अंतर्भूत असलेल्या बाबींना
प्रशासकीय मान्यता देणे

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी-१०.०८/प्र.क्र.१५५/फ-१
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : 04/02/2009

पहा : (१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास यांचे )
पत्र क्र.कक्ष -१/पी/असं/प्र.क्र.१४(भाग-२)(०७-०८) दि.१३/५/२००८
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांचे पत्र क्र. कक्ष -२२(६)/यो/ पर्यटन/ नबाप्र/ ७१५/०८-०९ दि.९/६/२००८

शासन निर्णय :

सन २००८-०९ च्या वार्षिक योजनेमध्ये " संरक्षित क्षेत्रातील निसर्ग पर्यटन विकास " या राज्यस्तरीय योजनेअंतर्गत संरक्षित क्षेत्रासाठी खालील बांधकामे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | संरक्षित क्षेत्र | प्रस्तावित कामे | | |
|---|---|---|---|---|
| | | बाब | प्रस्तावित खर्च | प्रशासकीय मान्यता |
| १ | ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प | १) पांगडी येथे हॉलिडे होमचे बांधकाम<br>२) मोहर्ली येथे सुसज्ज प्रतीक्षालय बांधणे | १०.००<br>२०.०० | १०.००<br>२०.०० |

३. उपरोक्त बांधकामांना रु.२०.०० लाखाच्या मर्यादेत खर्च करण्याच्या अटीवर तसेच सदर बांधकामांना सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या तांत्रिक मान्यतेस अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुतचा शासन निर्णय शासन निर्णय क्रमांक विअप्र-१०००/प्र.क्र.४६/२००१/विनियम, दि.११.७.२००१ मधील भाग पहिला, उपविभाग-५, अनुक्रमांक-१ परिच्छेद क्र.१३४ मधील तरतुदींनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(नितीन काकोडकर)
सहसचिव (वने)
महसूल व वन विभाग.

प्रति :

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३) महालेखापाल १ व २ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
४) मुख्य वनसंरक्षक, (वन्यजीव) नागपूर
५) वित्त विभाग, (व्यय-१०) मंत्रालय, मुंबई- ३२.
६) निवड नस्ती, फ-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई ३२.

क्रमांक कक्ष 3/अ/योजना/1650
नागपूर दिनांक 26 फेब्रुवारी 2009

प्रतिलिपी: वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर यांना माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीस्तव अग्रेषित.

मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
नागपूर